**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा परीक्षा पे चर्चा हा विद्यार्थ्यांशी संवाद नव्या स्वरुपात सादर/ देशभरातून ५ कोटींचा सहभाग

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्स दौऱ्यावर रवाना

- जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले सुमारे १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचा सोनिया गांधी यांचा दावा

- विदर्भ कौशल्य विकास विद्यापीठासाठी शंभर एकर जागा देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला आत्तापर्यंत १२० पदकांची कमाई

**<><><><><><>**

विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना केवळ परीक्षेत गुण मिळवण्याचा विचार न करता संबंधित विषयावर प्रभुत्व मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा महत्त्व दिलं पाहिजे, असं त्यांनी शिक्षक, आणि पालकांना सांगितलं. परीक्षेप्रमाणेच जीवनशैली विषयक अनेक प्रश्नांना मोदी यांनी उत्तरं दिली. पर्यावरण, कौटुंबिक नातेसंबंध अशा विविध विषयांचा त्यात समावेश होता.

***होल्ड बाईट मोदी (३८ सेकंद)***

परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचं स्वरुप आता बदललं असून तो ७ भागात सादर होणार आहे. आतापर्यंत बंद सभागृहात किंवा प्रेक्षागृहात होणारा हा कार्यक्रम आज नवी दिल्लीच्या सुंदर नर्सरीत झाडा फुलांच्या सोबतीने झाला. सुरुवातीलाच प्रधानमंत्र्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तिळगूळ देऊन गोड बोलायचा संदेश दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसमवेत हा कार्यक्रम पाहिला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकप्रकारे जीवनाचा मंत्र मिळत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले,

…. **बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले. पॅरिसमधे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह अध्यक्षपद ते भूषवतील. व्यापक जनहिताच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर परिषदेत चर्चा होणार असून जगातल्या विविध राष्ट्रांचे नेते आणि तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रमुख त्यात सहभागी होणार आहेत. याखेरीज फ्रान्स आणि भारताचे धोरणात्मक संबंध वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीनं मॅक्रॉन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी प्रयाणापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन ते करणार असून तिथं आंतरराष्ट्रीय औष्णिक अणुभट्टीलाही ते भेट देतील.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं. नंतर त्यांनी अक्षयवट आणि बडा हनुमान मंदिर इथेही भेट

दिली. डिजिटल महाकुंभ अनुभव केंद्रात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे महाकुंभाची माहितीही त्यांनी जाणून घेतली.

<><><><><>

जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, त्यामुळे सरकारने लवकरात लवकर जनगणना करावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केली. राज्यसभेत शून्य प्रहरा दरम्यान त्या बोलत होत्या. ग्रामीण भागातल्या नागरिकांना ७५ टक्के आणि नागरी भागातल्या नागरिकांना लाभ देणं हे अन्न सुरक्षा कायद्याचं उद्दिष्ट आहे, हा विशेषाधिकार नसून नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे असंही गांधी म्हणाल्या. या कायद्यामुळे देशातल्या लाखो नागरिकांचं उपासमारीपासून संरक्षण झालं असंही त्या म्हणाल्या.

दरम्यान, दोन्ही सभागृहांमधे अर्थसंकल्पावरच्या चर्चेला सुरुवात  झाली आहे.

<><><><><>

संसदेत आणि राज्य विधिमंडळांमध्ये नियोजित पद्धतीनं व्यत्यय आणणं तसंच सदस्यांचा कामकाजातला कमी होत चाललेला सहभाग याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी चिंता व्यक्त केली. राज्य विधिमंडळातल्या नवनिर्वाचित सदस्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते  आज दिल्लीत बोलत होते. कामकाजात हेतुतः व्यत्यय आणणं संसदीय लोकशाहीसाठी घातक असल्याचं ते म्हणाले. विविध संसदीय समित्यांच्या कामकाजाबद्दल तसंच संसदीय भाषेत आपला मुद्दा मांडण्याबाबत त्यांनी सदस्यांना माहिती दिली.

<><><><><>

विदर्भातल्या स्थानिक तरुणांना विविध कौशल्यांचं प्रशिक्षण देणाऱ्या विदर्भ कौशल्य विकास विद्यापीठासाठी शंभर एकर जागा देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी केली. नागपूर विद्यापीठ परिसरात काल खासदार औद्योगिक महोत्सवाच्या समारोप समारंभात ते बोलत होते.

आज विदर्भातल्या प्रत्येक क्षेत्राचा विकास होत असून त्या क्षेत्रांना व्यासपीठ देण्याचं काम या महोत्सवाने केल्याचं फडणवीस म्हणाले.

खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या आवृत्तीत विविध प्रकल्पांमधून साडे सात लाख कोटींची गुंतवणूक विदर्भात होत आहे. याशिवाय गडचिरोली जिल्ह्यात जगात सर्वात उत्तम दर्जाचे लोहखनिज असून यामुळे नजीकच्या जिल्ह्यात मोठमोठे उद्योग सुरु होतील, अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

**<><><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. भेटीचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. लोकसभेत मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता, मात्र विधानसभेची निवडणूक मनसेने स्वबळावर लढवली होती. अलिकडेच राज ठाकरे यांनी विधानसभेत महायुतीला मिळालेल्या मतांवर शंकाही उपस्थित केली होती.

**<><><><><><>**

सांडपाण्य़ाचा पुनर्वापर करण्यासाठी पर्यावरण विभाग सर्वसमावेशक आराखडा बनवणार असल्याची घोषणा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केली. आयआयटी पवई इथं ‘स्थानिक स्वराज्य संस्थांमधे सांडपाण्याचं व्यवस्थापन आणि शाश्वत उपाययोजना’ या विषयावर  परिषद आयोजित केली होती, यात त्या बोलत होत्या.

**<><><><><><>**

**पालघर** जिल्ह्यातल्या डहाणू, तलासरी, विक्रमगड आणि डहाणू नगरपरिषद क्षेत्रात राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत डी. इ. सी आणि अल्बेंडाझॉल गोळ्यांची सामुदायिक औषधोपचार मोहीम राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगानं या ठिकाणी ८२ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्येला याचा  लाभ होईल. दोन वर्षांपेक्षा लहान  बालकं, गरोदर माता आणि गंभीर आजारी व्यक्ती वगळता सर्व जनतेला हत्तीरोग प्रतिबंधक गोळ्यांचा डोस दिला जाणार आहे.

**नांदेड** जिल्ह्यात आजपासून हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबवण्यात येत आहे.

**<><><><><><>**

सोयाबीन खरेदी केंद्र पूर्ववत सुरु करून शेतकऱ्यांकडून  सोयाबीन हमीभावानं खरेदी करावं, या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातील निलंगा येथे आंदोलन सुरु आहे. त्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, छावा संघटना,  युवा सेना इत्यादी पक्षांचे काही  कार्यकर्ते बीएसएनएलच्या जवळपास दीडशे फूट उंच टॉवर वर चढले आहेत . शेतकऱ्यांकडे  हजारो टन सोयाबीन अद्यापही खरेदीविना पडून आहे. सरकारनं  किमान नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचचं  सोयाबीन हमी भावानं  खरेदी करावं  अन्यथा प्रति क्विंटल १ हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांना द्यावं, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

**<><><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातला वीजपुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी आज महावितरणच्या कार्यालयासमोर आंदोलन केलं. यावेळी अभियंता उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांनी कार्यालयाच्या दाराला हार

घालत निषेध नोंदवला. वीजपुरवठा सुरळीत झाला नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

**<><><><><><>**

३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं आत्तापर्यंत १२० पदकांची कमाई केली आहे. यात २९ सुवर्ण, ४३ रौप्य आणि ४८ कांस्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी कायम आहे. ४२ सुवर्णपदकांसह सेनादलाचा संघ पहिल्या, तर ३१ सुवर्णपदकं पटकावून कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर टिकून आहे. २३ सुवर्णपदकांसह हरियाणा चौथ्या, तर २० सुवर्णपदकं जिंकून मध्य प्रदेश पाचव्या स्थानावर आहे. १५ सुवर्णपदकांसह यजमान उत्तराखंडचा संघ सातव्या स्थानावर आहे.

**<><><><><><>**

क्षमता विकास करणं आणि शालेय स्तरावरच कौशल्य विकासाची परिसंस्था निर्माण करणं हे कौशल्य विकासाच्या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे, असं कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. अनेक राज्यांनी कौशल्य विकास संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, मात्र केंद्र पातळीवर अशी संस्था स्थापन करायचा कोणताही विचार नाही, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

आकाशवाणी मुंबईच्या CSU अर्थात केंद्रीय विक्री विभागातले सहाय्यक संचालक रविश मंगळवेढेकर यांचं आज सकाळी दीर्घ आजारानं निधन झालं. ते ५९ वर्षांचे होते. १९८९ पासून ते आकाशवाणीच्या सेवेत कार्यरत होते. केंद्रीय विक्री विभाग, मुंबई तसंच रत्नागिरी आकाशवाणी केंद्रावर विविध पदांवर त्यांनी काम केलं होतं.

**//<><><><><><>//.**